पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४७९ दिनांक - ०१/०७/२०२३**

खंडणी विरोधी पथक - २ गुन्हे शाखा, पुणे शहर

## दूध डेअरी व्यावसायीक तसेच नोकरदार यांचेकडून सावकारी रकमेवर अधिक दराने व्याज घेणारे व खंडणीची मागणी करणारे अवैद्य सावकार यांना अटक

अर्जदार धंदा दुध डेअरी,रा.गुलटेकडी पुणे यांनी त्यांचे गरजेपोटी विनापरवाना सावकारी व्यवसाय करणारे सावकार नामे १) यश संजय मेमाणे व २) मानव संजय मेमाणे दोघे रा.शिवांजली मित्र मंडळाचे शेजारी, १ न्यु रविवार पेठ,पुणे यांचेकडुन शिवांजली मित्र मंडळाजवळ,कस्तुरे चौक,पुणे येथे एकुण १,९०,०००/- रुपये दरमहा १० टक्के व्याजदराने घेवुन त्यांचा मारुती सुझुकी टेम्पो हा सदरचे अवैदय सावकारांकडे गहाण ठेवुन अर्जदार यांनी सावकारांना गुगल पे व रोख स्वरुपात असे मिळून १,७१,०००/- रुपये व्याज देवुन स्वतःचा गहाण ठेवलेला टेम्पो परत मागीतला असता तो न देता सावकारांनी अर्जदार यांचेकडे आणखीन २,००,०००/- रुपयांची अवाजवी रक्कमेची मागणी करुन ती न दिल्यामुळे अर्जदार यांना शिवीगाळ,हाताने मारहाण करुन अर्जदार यांचे सॅमसंग कंपनीचे स्मार्ट वॉच काढुन घेतले म्हणुन अर्जदार यांनी दिले फिर्यादीवरुन सदरचे दोन अवैद्य सावकारांचे विरुध्द खडक पो.स्टे.येथे गुन्हा रजि.नं.२०९/२०२३ भा.दं.वि.कलम ३८४,३८५, महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलम ३९, ४५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपीस ताब्यात घेऊन पुढील तपास कामी खडक पो.स्टे.चे ताब्यात देण्यात आले आहे.

तसेच अर्जदार रा.शनिवार पेठ पुणे यांनी होम लोन व मॉरगेज लोनचा व्यवसाय सुरु करण्यासाठी विनापरवाना सावकारी व्यवसाय करणारा सावकार नामे सुरज मनोज परदेशी रा.खोपडेनगर, गुजरवाडी,कात्रज पुणे याचेकडून शनिवारवाडा चौपाटी,शनिवारपेठ पुणे येथे एकुण ४५,०००/- रुपये दरमहा २० टक्के व्याजदराने घेवुन त्या मोबादल्यात अर्जदार यांनी त्यांचे गुगल पे व फोन पे व्दारे सावकार सुरज परदेशी याचे गुगल पे व फोन पे वर ४ लाख रुपये ऑनलाईन व ५० हजार रुपये रोख स्वरुपात असे एकुण ४,५०,०००/- रुपये दिले असताना देखील सावकार सुरज परदेशी याने अर्जदार यांना वारंवार फोन करुन व भेटून शिवीगाळ करुन,घरी येवुन बदनामी करण्याची धमकी देवुन आणखीन व्याज व मुद्दल असे एकूण १,५३,०००/- रुपयांची अवाजवी मागणी करीत असल्यामुळे अर्जदार यांनी दिले फिर्यादीवरुन सावकार सुरज मनोज परदेशी याचेविरुध्द विश्रामबाग पो.स्टे.येथे गुन्हा रजि.नं.१३६/२०२३ भा.दं.वि.कलम ३८४,३८५, महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलम ३९,४५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन. सदर आरोपीस ताब्यात घेऊन पुढील तपास कामी विश्रामबाग पो.स्टे.चे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अमोल झेंडे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२ श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शानाखाली खंडणी विरोधी पथक २,गुन्हे शाखा,पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर, सहा.पो.निरी.चांगदेव सजगने, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत चव्हाण,मोहनदास जाधव व पोलीस अंमलदार विजय गुरव,सुरेंद्र जगदाळे, विनोद साळुंके, संग्राम शिनगारे,ईश्वर आंधळे,अनिल मेंगडे,राहुल उत्तरकर,सैदोबा भोजराव,सचिन अहिवळे,चेतन आपटे,पवन भोसले, किशोर बर्गे,प्रदिप गाडे,आशा कोळेकर यांनी केलेली आहे.